# त्रिवार वंदन, नरशार्दूला !



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४९४
REFBK-0024055
REFBK-0024055

सौ. लीला वेलंकीवार

ठाणे
नोव्हेंबर १९८३

गीतरचना : लेखिका : प्रकाशिका–

**सौ. लीला वेलंकीवार**

बी. ए., बी. टी.

ई १०९/७, श्रीरंग सहनिवास,
ठाणे (प.) ४०० ६०१.

(सर्व हक्क स्वाधीन)

---

सदर गीतांचा कार्यक्रमासाठी उपयोग करावयाचा झाल्यास लेखिकेची पूर्वसंमती आवश्यक आहे.

---

# अनुक्रम


| क्रमांक | गीत | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ | वंदना | १–३ |
| २ | नवल हे | ३–४ |
| ३ | सांजवात | ५ |
| ४ | वाढदिवस | ६–७ |
| ५ | देवी चंडिके ! | ७–८ |
| ६ | जयजयकार करा | ८–९ |
| ७ | होळी | १०–११ |
| ८ | दीरभावजयी | १२ |
| ९ | अबला असलो जरी | १३–१४ |
| १० | कागद | १४–१६ |
| ११ | या बंधूनो ! | १६–१७ |
| १२ | शस्त्रसज्ज व्हा | १७–१८ |
| १३ | सांगता | १८–२० |

२४०५५
२४।११।८३
REFBK-0024055
REFBK-0024055

# १

# वंदना

अनेक फुलें फुलतों । फुलोनिया सुकोन जाती ॥
कोणी त्यांची महती गणती । ठेविली असे ॥४॥
परी जे गजेंद्रशुंडेनें अुपटिलें । श्रीहरीसाटीं मेले ॥
कमल फूल तें अमर ठेलें । मोक्षदायी पावन ॥५॥

धन्य धन्य आपुला वंश । सुनिश्चयें ईश्वरी अंश ॥
श्री-राम-सेवा-पुण्य-लेश 1 आपुल्या भाग्यीं लाधला ॥८॥

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या वहिनीला लिहीलेल्या पत्रातील या ओळी म्हणजे साहित्याचे भूषण आहे. त्यांचे संपूर्ण कुटुंबच या स्वातंत्र्ययज्ञाच्या आगीत होरपळत होते आणि ही एक आपत्ती नसून भाग्याची गोष्ट आहे असे ते मानीत होते. मातृभूमीसाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या ह्या नरश्रेष्ठाचे व्यक्तिमत्व अष्टपैलूच नव्हे शतपैलू होते. समाजसुधारक, विज्ञानवादी, भाषाप्रभू, क्रांतीवीर, देशभक्त, कवी, वक्ता, नाटककार, निबंधकार अशी अनंत रुपे या बहुरुपाने धारण केली आहेत. एका खिशात अत्तराची कुपी तर दुसऱ्या खिशात कटचार असा हा रसिकवर आणि वीरवर. वैभव, कीर्ती यांची अपेक्षा न करता सदैव ध्येयावर दृष्टी ठेवणारा हा मृत्युंजय लौकिकदृष्टया उपेक्षितच राहिला पण या अनभिषिक्त सम्राटाला भारतीयांनी आपले हृदयसिंहासन मोठ्या प्रेमाने बहाल केले.

स्वातंत्र्यवीराचें चरित्र म्हणजे एक खळखळणाऱ्या प्रवाहाची विशाल पात्राची भागीरथी. तिच्या संपूर्ण स्वरुपाचे आकलन होणें आम्हा सामान्यांच्या सामान्य दृष्टीला

केवळ अशक्य. **आज** आपण या पवित्र भागीरथीतीरी फक्त एक आचमन करणार आहोत. त्या पुण्यात्म्याला **वंदन** करुन रसिकांच्या उपस्थितीत पहिले गीतपुष्प सादर करीत आहोत.

गणेश नाही नाहि गजानन गौरीनंदन नव्हे
विघ्नविनायक विनायकाचे रूप असे हे नवे ॥

❁ ❁ ❁

गणेश नाही नाहि गजानन
गौरीनंदन नव्हे
विघ्नविनाशक विनायकाचे
रूप असे हे नवे ॥

राजमुकुट ना राजचिन्हही
नाही सिंहासन
अनभिषिक्त ह्या सम्राटाचे-
अढळ तरी आसन
मंत्रविभूषित जीवनसमिधा
अर्पी यज्ञेश्वरा
त्रिवार वंदन नरशार्दूला
मृत्युंजय वीरा ॥१॥

भैरव तांडव करी कधी हा
जलस्थल हो व्याकुळ
कधी फुलावा मोरपिसारा
कधि मुरली मंजुळ
कधी डफावर थाप मारुनी-
शाहिर होतो खडा
रुणझुण पैंजण कधी झननन्
नाजुक नखरा बडा
कटयार आणि कुपी सुगंधी
सावरणाऱ्या करा
त्रिवार वंदन नरशार्दूला
रसिकवरा वीरा ॥२॥

महारथींना मत्सर वाटे
अचूक शरसंधान
तत्त्वज्ञांचा गर्व हरावा
असे तुझे विज्ञान
भल्याभल्यांचे घास घेतसे--
जिथे यमाचे द्वार
अंदमानचा बंदिवान हा
मुक्त करी संचार
बुद्ध्या धरिले वाण सतीचे
भगीरथा ! भास्करा !
त्रिवार वंदन नरशार्दूला
मृत्युंजय वीरा ॥३॥

# २

# नवल हे

इ. स. १८८३. म्हणजे आज बरोबर १०० वर्षे झाली. उन्हाळ्याचे दिवस. वैशाखाचे रणरणते ऊन. घरात रणचंडीची उपासना असायची. कस सुखवस्तु कुटुंब सावरकरांच. पण बलीकडे राधाबाईना फारच अस्वस्थ वाटायच. तस म्हटल तर ही काही पहिली वेळ नव्हे. बाबा नाही का त्यांचा पहिला मुलगा ? त्याची बाळलेणी, एक चांदीचा खुळखुळा—सगळं पाहून राधाबाई आपल्या दुसऱ्या बाळाच्या गोजिरवाण्या रुपांच चिंतन करायच्या. पण यावेळी त्यांना काही विचित्रच भास व्हायचे. स्वप्नात शंकराची बालमर्ती दिसायची पण त्याच्या हातातील डमरुमधून बासरीचे मंजुळ सूर ऐकू यायचे. जलविहार, चांदण्यातलं वनभोजन यातलं काही काहीच त्यांना आवडायच नाही. कस आवडेल ? त्यांच्या पोटी येणाऱ्या असामान्य बालकाच्या झंझावाती भविष्याची ही पूर्वचिन्हे तर नसतील ? शेवटी त्या देवींची करुणा भाकतात आणि म्हणतात 'नवलच आहे बाई ! असे काय भास होतात मला. कोणी बंडखोर तर माझ्या पोटी येणार नाही ना ? आई जगदंबे ! चुकलं माकलं पोटात घे. तुझ्या कृपेची पाखर माझ्या बाळावर सदैव असू दे. तुझ्या वाचून कोण त्याचे रक्षण करणार ?'

बालशिवाच्या
डमरूमधुनी
मुरलीरव यावे
नवल हे कोणा सांगावे ।।

बाळकृष्ण मी नित्य पूजिते
बाळरूप ते मज मोहविते
रोज परंतू स्वप्नी माझ्या
रामधनू यावे ॥१॥

जलक्रीडा मज नकोनकोशी
सागरसंगत हवीहवीशी
लाटांवरूनी फिरत बघावी
मोऱ्यांची गावे ॥२॥

चांदण्यातले वनभोजनही
मजसि रुचेना त्यातिल काही
निबीड रानी घन अंधारी
वाटे विहरावे ॥३॥

मी चांदीचा एक खुळखुळा
इथेच होता जपुन ठेवला
उघडुन बघता आजच हाती
त्रिशूळ कां यावे ॥४॥

हे जगदंबे ! पदर पसरिते
असेल चुकले, क्षमा मागते
उदरि वाढतो बंडखोर हा
रक्षण त्या द्यावे ॥५॥

# ३

# सांजवात

विनायकला सारेजण तात्या म्हणत. देवळे बांधावी, पालखीची मिरवणूक काढावी हा तात्याचा आवडता छंद. वयाच्या ७ व्या वर्षी या लाडल्याची मुंज झाली. बस्स् ! एवढेच सौख्य राधाबाईंच्या नशिबात होते. गावात अचानक महामारीची साथ आली आणि भरल्या संसारातून राधाबाई उठून गेल्या ! आपल्या मृत्यूची चाहूल त्यांना लागली असेल का ? त्या म्हणतात.

लाविते सांजवात मी घरी
देवापुढचीं ज्योत दिव्याची
थरथरते का परी ।

लाविते सांजवात मी घरी
देवापुढची ज्योत दिव्याची
थरथरते का परी ॥ ध्रृ ॥
प्राणाहुन प्रिय घरकुल माझे
इच्छित सारे मिळे
गुण बाळांचे जगावेगळे
वैभव हे आगळे
अजुनी नाही फुटले पुरते
पंख पिलांना परी ॥ १ ॥
कधि दुःखाची कधी सुखाची
जाणिव देशी हरी
तुझ्या कृपेची दिव्य प्रचीती
घडली वरचेवरी
प्रिय बाळावर तुझी साऊली
छत्र धरी श्रीहरी ॥ २ ॥
हे सर्वज्ञा ! तुझीच आज्ञा
प्रमाण मनुजा जरी
तुटते अंतर निरोप घेता
या जगताचा तरी
संध्यावंदन बाळासह हे
अखेरचे का परी ॥ ३ ॥

# ४

# वाढदिवस

राष्ट्राला शस्त्रसज्ज होण्याचा संदेश देणारा पहिला स्वातंत्र्यवीर म्हणजेच वि. दा. सावरकर. विनायक जसजसा मोठा होऊ लागला तसतसा त्याच्या असामान्य व्यक्तिमत्वाचा आविष्कार प्रगट होऊ लागला. देवीपुढे बसून पोथी रचणे, बाबाबरोवर शस्त्राने द्वंद्वयुद्ध खेळणे, मित्र जमवून लुटुपुटूच्या लढाया लढणे हे त्याला फार आवडे. असाच एक वाढदिवस विनायक साजरा करीत आहे. आता आई नाही कौतुक करायला पण आईसारखीच माया लावणारी प्रेमला वत्सला येसूवहिनी तर आहे ना ? या बालनेत्याला सैनिकांचा राजा व्हायच आहे. त्याला काठीचा घोडा नको, लुटुपुटूची बंदूक नको—सगळ खरखुर हवय. मायभूमीचा एकनिष्ठ सेवक होण्याचे स्वप्न पाहणारा बाल विनायक मित्राबरोबर खेळताना हणतो—

छोटे छोटे जवान तुम्ही
मीं तर तुमचा राजा ।।

❁ ❁ ❁

छोटे छोटे जवान तुम्ही
मी तर तुमचा राजा
चला गड्यांनो करू साजरा
वाढदिवस माझा ।।
वहिनी माझी सवंगडी हे
मजला भारी आवडती
वीरकथा अन् वीरगीतही
इथे मनाला रिझवीती
चला सज्ज व्हा मर्द मराठे
बोला वंदे मातरम्
लटुपुटुच्या करू लढाया
गर्जा वंदेमातरम्
तुम्ही मावळे आणी मी तर
बाल शिवाजी राजा
चला गड्यांनो करू साजरा
वाढदिवस हा माझा ।। १ ।।

आज जरी मी दिसतो छोटा
मोठा लवकर होणार
लुटुपुटूची बंदुक माझी
खरोखरीची बनणार
नको काठिचा खराच घोडा
रणांगणावर लढणार
एकनिष्ठ मी मातृभूमिचा
अजिंक्य सेवक ठरणार
शिलेदार मी करीन रक्षण
देशाचा दरवाजा
चला गडयांनो करू साजरा
वाढदिवस माझा ॥ २ ॥

## ५

# देवी चंडिके !

विनायक हे बुद्धिदात्या गजाननाचे नांव. विनायक हे नांव धारण करणारा हा कुमार नावाप्रमाणेच तरल बुद्धीचा— उत्तम स्मरणशक्तीची देणगी लाभलेला. १८५७ नंतरचा तो काळ म्हणजे दडपशाहीच्या जाचातून बाहेर पडण्याच्या धडपडीचा काळ. वासुदेव बळवंत गेले. पाठोपाठ चाफेकर बंधूही फासावर गेले. वाचनाची अखंड आवड आणि शीघ्र कवित्वाचे वरदान लाभलेल्या विनायकावर सभोंवतालच्या परिस्थितीचा एवढा परिणाम झाला की तत्कालीन स्थितीवर केवळ पोवाडे रचूनच वा काव्य करुनच त्याचे मन स्वस्थ बसले नाही तर त्याने १९०० मध्ये मित्रमेळा ही संस्था स्थापन केली. या गुप्त संस्थेचे सभासद त्यांची कसोटी पाहून निवडले जात व त्यांना प्रतिज्ञा दिली जाई. विनायकाने अवघ्या पंधराव्या वर्षी देवीपुढे प्रतिज्ञा घेतली—

"यापुढे मी माझ्या देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारुन मारिता मारिता मरेतो झुंजेन"

चंडिकेची आळवणी करणाऱ्या त्या प्रसंगाचे दर्शन पुढील काव्यात घडविले आहे.

जय जय जय श्री देवी चंडिके
कृपा अम्हावर तुझी असू दे ll

----

जय जय जय श्री देवि चंडिके
कृपा अम्हावर तुझी असूदे llधृll

मंगलाकृती अष्टभुजांची
तूच स्वामिनी मांगल्याची
ऐक प्रार्थना ही बालांची
नवस्फूर्ती दे
नवजीवन दे ॥१॥

युवकसंघ हा शपथ वाहतो
देशहितास्तव प्राण अर्पितो
आज विनायक तुज विनवीतो
मार्ग दिसू दे
दिशा उजळु दे ॥२॥

नव्या युगाचा युवक नवा मी
झुंजझुंजता यावे कामी
हीच प्रतिज्ञा तुझिया नामी
सुयश सदा दे
शुभ आशिष दे ॥३॥

६

# जयजयकार करा

मित्रमेळा संस्थेच्या हालचालीकडे सरकारची नजर वळणार अशी चिन्हे दिसू लागताच सावरकरानी मित्रमेळ्याचे रूपांतर अभिनव भारत या संस्थेत केले. लोकमान्य टिळकांच्या कर्तृत्वाच्या ऐन भराचा तो काळ. गणेशोत्सव, शिवजयंती इत्यादि उत्सव साजरे करून असंतोषाचे लोण साऱ्या जनतेत पसरविण्याचे कार्य अभिनव भारतातर्फे मोठ्या उत्साहाने चालू असे. गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज हे तर सावरकरांचे दैवत, स्फूर्तीस्थान. एके ठिकाणी सावरकर म्हणतात– कमरेवर हात ठेऊन उभा असलेला विठोबा सात्विक आहे पण त्याला भरडणाऱ्या अफझुलखानाचे पोटच आमच्या शिवाजीनें फाडून टाकले. शठे प्रति शाठ्यम् अशा त्या हिंदवी स्वराज्यसंस्थापक छत्रपती बद्दल त्यांना नितान्त आदर आहे. असाच एक शिवजयंती उत्सव अभिनव भारत साजरा करीत आहे.

जयजयकार करा हो
जयजयकार करा
गोब्राह्मणप्रतिपालक
छत्रपतीव्रतधारक
शिवभूपाल खरा ॥

---

२१८७
२२०५५
काव्य २२/११/८३

जयजयकार करा हो
जयजयकार करा
गोब्राह्मणप्रतिपालक
छत्रपतीव्रतधारक
शिवभूपाल खरा ॥ धृ ॥
भारतभू अतिआर्तस्वरे हीं
विनवी गौरिहरा
भू, विनवी गौरिहरा
शिवगण सैनिक बनले
हरहर गर्जत आले
शिव घे अवतारा ॥ १ ॥
धन्य जिजाई तव पुण्याई
चमके एक हिरा
सुत, चमके एक हिरा
शतकांच्या इतिहासी
शौर्याच्या आकाशी
अविचल ध्रुवतारा ॥ २ ॥
खड्ग करी दे श्री जगदंबा
मंगल देई वरा
शिरि, मंगल ठेवी करा
अरिदलबल संहरिले
सिंहासन भूषविले.
युग युग हा दसरा ॥ ३ ॥
जय क्रांतीचा जय क्रांतीचा
अविरत घोष करा
हो अविरत घोष करा
बलशाली राष्ट्राचा
उज्वल स्वातंत्र्याचा
ध्वज हा उंच धरा ॥ ४ ॥

卐

# ७

# होळी

सन १९०५. आक्टोबर महिना. दसऱ्याचा सुमुहुर्त. सावरकर तेव्हा पुण्याला कॉलेजमध्ये शिकत होते. लो. टिळकांच्या चतु:सूत्रीचा प्रभाव तरुणांवर विशेष पडत होता. भारतातून कच्चा माल बाहेर जाई व तोच माल पक्का होऊन भारतात विक्रीला येई. लोकांना मऊ, मुलायम, सुबक कापडाचे आकर्षण वाटायचे व इंग्रज हे तर राज्यकर्ते. त्यांच सगळचं चांगलं वाटायच. जनतेत देशप्रेम व चैतन्य निर्माण करण्याच्या उद्देशाने परदेशी मालाची होळी करायची अस सावरकरांनी ठरविल, 'उपक्रम पोरकट दिसता उपयोगी नाही" हा लो. टिळकांचा सल्ला शिरोधार्य मानून त्यांनी तरुण मंडळींच्या सहाय्याने भलामोठा विदेशी कापडाचा ढीग तयार करविला. काळकर्ते शि. म. परांजपे व लो. टिळकांच्या उपस्थितीत दसऱ्याच्या दिवशी विदेशी कापडांची होळी करण्यात आली त्यावेळी सावरकरांनी पुणेकर जनतेला आवाहन केले–

पुणकरांनो,

विदेशी मालावर बहिष्कार टाकण्याचा पहिला मान तुमचा.

पुणेकरांच्या पुण्याईचा उत्सव थाटाचा
चला पेटवा पहिली होळी मुहूर्त दसऱ्याचा ll

–०–०–०–

पुणेकरांच्या पुण्याईचा उत्सव थाटाचा
चला पेटवा पहिली होळी मुहूर्त दसऱ्याचा ll धृ ll

शिवरायांची सुंदर स्वप्ने गेली विलयासी
एक तागडी घेउन येथे आले परदेशी
स्वातंत्र्यासह स्वत्व संपले सरला अभिमान
छत्रपतीसह या भूमीची सरली हो शान

अठराशे सत्तावन साल
सोनेरी पान झळकलं
शर्थीचं झुंज जरि केलं
अपेशी झाल अपेशी झाल
स्वातंत्र्याचं युद्ध आमुचं बंड च हो ठरलं

देशवेशसंदेश विदेशी वाटे मोलाचा
चला पेटवा पहिली होळी मुहूर्त दसऱ्याचा ll १ ll

"येस फेस आले 'होयबा' झाले आली लाचारी
मने शरीरे दुबळी झाली गेल्या समशेरी
अंग्रेजीचा रुबाब भारी ऐट तिची न्यारी
'आईबाबा' 'मंम्मीडँडी' 'क्षमस्व' ही 'स्वॉरी'
गोऱ्याची काळि सावली
भयानक आली
दुर्दशा झाली
भूमि थरथरली भूसि तरथरली
आलि अवकळा या देशाला नाहि कुणी वाली
जे जे पश्चिम ते ते उत्तम भ्रम हा लोकांचा
चला पेटवा पहिली होळीं मुहूर्त दसऱ्याचा ॥२॥

माल विदेशी नें परदेशी अमाप धनराशी
सुवर्णभूचा सुपुत्र येथे राही उपवाशी
सात समुद्रा सारूनि आल्या कपडयांच्या राशी
त्याच कशाला हव्या तुम्हाला ? इमान कोणाशी
जूलमाचं राज्य माजलं
गोरं टोपी वालं
काल जरी आलं
गबर लइ झालं, गबर लइ झालं
अन् ह्येच्यापायी कष्टकऱ्याचं मरण मात्र आलं
पुणेकरांनो मान तुम्हाला पहिला होळीचा
चला पेटवा पहिली होळी मुहूर्त दसऱ्याचा ॥३॥

सिंहगर्जना ऐका जनहो ! मारितसे हाका
पुणेकरांनो बळवंताचे आवाहन ऐका
स्वराज्य आहे ध्येय तयाचे बहिष्कार मंत्र
नष्ट करावा माल विदेशी हे देशी तंत्र
धडधडा होळी पेटु द्या
धूर कोंडु द्या
देश जागु द्या
आग भडकु द्या आग भडकु द्या
उंच उंच ह्या ज्वाळा जाऊन लंडन गाठू द्या
सत्तावनच्या शताकार्धाला प्रणाम हा अमुचा
चला पेटवा पहिली होळी मुहूर्त दसऱ्याचा ॥४॥

# दीरभावजयी

जयासी तुवां प्रतिपाळिले । मातेंचे स्मरण होऊं न दिले ॥
श्रीमती वहिनी वत्सले । बंधु तुझा तो तुज नमी ॥ १ ॥

मराठी भाषेत अमर झालेले हे सावरकरांचे काव्य आहे. दोघेही सावरकर बंधु (श्री. गणेशपंत व डॉ. बाळ) कारावासात, सरकारी रोषाला भिऊन समाजाने संबंध तोडलेले. अशावेळी निराधार एकाकी पडलेल्या आपल्या येसुवहिनीला धीर देण्यासाठी तिच्या पत्राला उत्तर म्हणून सावरकरांनी लिहलेल्या कवितेतील वरील दोन ओळी. या दीरभायजयीचे स्नेहसंबंध ही एक आश्चर्याची गोष्ट आहे. ते दीरभावजयीचे नाते नसून एकाच ध्येयाने प्रेरित झालेल्या दोन देशभक्त पुण्यात्म्यांचे नाते होते. आमच्या या भरतभूमीला ललामभुत झालेस्या आणखी दोन दीरभावजयींच्या जोडया आहेत. एक सीतामाई व लक्ष्मण ही पौराणिक जोडी. दुसरी येसूबाई व राजाराम यांची ऐतिहासिक जोडी. पण ही तिसरी आधुनिक जोडी–यातही एक येसूबाई आहेच–सावरकर आणि त्यांची येसूवहिनी यांची ही तिसरी जोडी–केवळ-अजोड. "अशी भातृजाया असा धन्य दीर !"

सती जानकी राहिली घोर रानी
तिची पैंजणे मात्र सौमित्र जाणी
तयांच्याच पुण्ये रघूवंश थोर
अशी भ्रातृजाया असा धन्य दीर ॥१॥
जरी राजमाता असे बंदिवान
स्वराज्यात संदेश जाती तिथून
झिजे रामराजा बनोनी फकीर
अशी भ्रातृजाया असा धन्य दीर ॥२॥
पुन्हा एक विख्यान जोडी अजोड
जिच्या दिव्य त्यागास नाहीच तोड
जिला मानितो वंद्य स्वातंत्र्यवीर
अशी भ्रातृजाया असा धन्य दीर ॥३॥

卐

## ९

# अबला असलो जरी

श्री गणेशपंत काळचा पाण्यावर गेलेले व डॉ. बाळ अटकेत पडून त्यांच्याच मागे जाण्याची शक्यता निर्माण झालेली. तितक्यात १९१० च्या मार्चमध्ये सशस्त्र चळवळ करण्याच्या आरोपावरुन सावरकरांना विलायतेत अटक करण्यात आली. ही कठोर बातमी वहिनीना कळविणारे व त्याच बरोबर स्वातंत्र्यप्राप्तीचे उदात्त ध्येय सांगणारे काव्यात्मक पत्र – माझे मृत्युपत्र – सावरकरांनी बिक्स्टन जेलमधून पाठविले उन्हाळ्याच्या दिवसात सावरकर कुटुंबातील सर्व युवक युवती एकत्र आले की सौधावरील चंद्रप्रकाशात बसून क्रांतीकार्याची आखणी करीत. त्याची आठवण देऊन सावरकर येसूवहिनीला त्या पत्रात लिहतात –

झाल्या तदा प्रियकरांसह आणभाका ॥
त्या सर्व देवि वहिनी, स्मरती तुम्हां कां ?
'बाजी प्रभू ठरुं' वदे युवसंघ सर्व
'आम्ही चितोरयुवती' युवती सगर्व ॥८॥

सावरकरांच्या नाटकांतील सगळ्या नायिका शस्त्रधारी आहेत. त्यांच्या कुटुंबातील कुलकन्याही वीरांगना आहेत. हा योगायोग की त्यांच्या लेखणीचे ते अपरिहार्य स्वरूप ? सावरकर म्हणतात –

तें भारतीय अबलाबलतेज कांहीं ॥
अद्यापि या भरतभूमित लुप्त नाही ॥
हे सिद्ध होजिल असेंच अुदार, अुग्र ॥
वीरांगने तव सुवर्तन हो समग्र ॥२३॥

स्वातंत्र्याच्या या महान यज्ञात आमच्या देशातील नारीसुद्धा मागे नाहीत हे काळानें सिद्ध केले आहे. भूतकाळातच नव्हे तर वर्तमानातसुद्धा आमच्या अबला म्हणविणाऱ्या महिला आपला देशकार्याचा वाटा अहमहमिकेनें उचलत आहेत. त्या म्हणतात –

मारतभूच्या भवितव्याचे
सूत्र आमुच्या करी
अबला असलो जरी ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९९४
क्र. २२०५५

भारतभूच्या भवितव्याचे
सूत्र आमुच्या करी
अबला असलो जरी ॥ ध्रू ॥
अबला म्हणुनी अजवर जगलो
इतिहासाला लांछन ठरलो
शल्य करू या दुरी ॥१॥
सदैव सुंदर रुपमनोहर
परी प्रसंगी उग्र भयंकर
कराल काळापरी ॥२॥
प्रबळांनाही या अबलांनी
समशेरीचे पाजुनि पाणी
लोळविले संगरी ॥३॥
वेश आमुचा रणचंडीचा
घोष निरंतर 'जय जननीचा'
दुमदुमतो अंबरी ॥४॥
सौभाग्याची देउनि दाने
मान रक्षितो प्राणपणांने
उत्तर सीमेवरी ॥५॥
राष्ट्र भक्तिचे बांधुनि कंकण
शिवशाहीचे मंगल तोरण
पुन्हा उभारू घरी
अबला असलो जरी ॥६॥

## १०

# कागद

परदेशातील शिष्यवृत्ती घेऊन सावरकरांनी १९०६ च्या जूनमध्ये विलायतला प्रयाण केले. या परदेशगमनात त्यांचे दोन उद्देश होते. राज्यकर्त्यांचा देश पहावा, त्यांची ताकद जोखावी हा एक आणि दुसरा म्हणजे हातबाँब तयार करण्याची विद्या शिकून ती भारतात आणणे. सावरकरांनी शत्रूच्या भूमिलाच आपले कार्यक्षेत्र बनविले. १८५७ चे स्वातंत्र्यसमर प्रसिद्ध झाले. पिस्तुले आणि हातबाँबच्या पुस्तिका भारतात येऊन पोचल्या. परिणाम व्हायचा तोच झाला. कर्झन वायली, जॅक्सन इ. च्या वधाबरोबर तपासाची चक्रे

फिरू लागली आणि सावरकरांना अटक करण्यात आली. मुंबई हायकोर्टात खटला चालून त्यांना दोन जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली आणि जुलै १९११ मध्ये त्यांची अंदमानात रवानगी करण्यात आली.

'सहा सोनेरी पाने' लिहणारा हा भाषाप्रभू सातवे सोनेरी पान स्वतः जगून दाखवित होता.

हे मातृभूमि, तुजला मन वाहियेले !
वक्तृत्व–वाग्विभवही तुज अर्पियेले !
तूतेंचि अर्पिली नवी कविता रसाला !
लेखांप्रति विषय तूचि अनन्य झाला ॥१६॥

लिहण्यासाठी मातृभमिव्यतिरिक्त दुसरा कोणताही विषय तात्यारावांना मान्य नव्हता. विषय एकमेव तर ठरलेलाच होता. पण लिहण्यासाठी कागद ? लेखन साहित्य तर हवे ? अंदमानची ती एकलकोंडी. वाचन आणि लेखन हा तिथे गुन्हा ठरायचा. कैद्यांना पत्रव्यवहारास मज्जाव. आणि ह्या बेडया घातलेल्या वेडया कैद्याला कविता लिहण्याची स्फूर्ती आली. लोखंडी गजातून आकाश तेवढे दिसत होते. आणि त्यालाच सावरकर विनवू लागले.

आकाशा ! ऐक जरा रे ऐक
विशाल सुंदर
निळसर कागद
तूच तूच रे एक ॥

❁ ❁ ❁

आकाशा ! ऐक जरा रे ऐक
विशाल सुंदर
निळसर कागद
तूच तूच रे एक ॥धृ॥
स्वातंत्र्ययज्ञ चेतविला
अपराध हाच मम झाला
अंदमानचा बंदिवान मी
कागद येथे कुठला ॥१॥
अंधार भयंकर दाटे
टोचती छळांचे काटे
जीवन आटे परि आईचे
गीत लिहावे वाटे ॥२॥

तू कागद माझा व्हावें
मी क्रांतिगीत जुळवावे
बघुन दृष्य हे प्रतिभेलाही
अगणित पंख फुटावे ॥३॥

# ११

# या बंधूनो

अस्पृश्योद्धारसिध्यर्थं प्रारब्धं सहभोजनम् ।
विनायकं महात्मानं शिरसा प्रणयाम्यहम् ।।
— बा. छो. गोविंदेकर

(अस्पृश्यांचा उद्धार साधावा म्हणून ज्यांनी सहभोजनाची चळवळ सुरु केली त्या महात्मा विनायकाला (सावरकरांना) माझे वंदन असो.)

विसाव्या शतकातील पहिल्या सात दशकावर स्वकर्तृत्वानें त्याने स्वतःचे नांव कोरुन ठेवले आहे असा नव्या समाजाचा स्मृतिकार म्हणजे स्वा. वि. दा. सावरकर.

अंदमानातून सुटका झाल्यावर काही काळ त्यांना स्थानबद्धेत काढावा लागला. तेव्हा शासकीय निर्बंधाच्या मर्यादा सांभाळून त्यांनी केलेले महनीय कार्य म्हणजे अस्पृश्योद्धाराचे प्रयत्न.

दलितोद्धार आज एक सर्वमान्य चळवळ आहे पण त्याकाळी बहिष्कृत होण्याची तयारी ठेवूनच हा मार्ग चोखाळावा लागे. सावरकर याही दिव्यातून पार पडले. अस्पृश्यांच्या हातचा प्रसाद ग्रहण केल्यामुळे कुत्सित टीका सहन करावी लागल्याची आठवण त्यांचे चिरंजीव विश्वास सावरकर यांना अजूनही आहे. (महाराष्ट्र टाइम्स २७-२-८३)

श्री. भागोजी कीर या धनवान असामीला हाताशी घेऊन सावरकरांनी पतीतपावन मंदिराची स्थापना केली. त्या ठिकाणी स्पृश्यास्पृश्यांचे सामुदायिक हळदीकुंकू, तिळगुळ समारंभ एवढेच नव्हे तर सहभोजनाचेही कार्यक्रम होत. आजही ही समस्या ज्वलंत आहे. समाजक्रांतीची ही नवी दिशा दाखवणाऱ्या सुधारकाच्या समतावादी सामाजिक विचारांचे मनन आणि आचरण म्हणजेच सावरकरांचे खरे पुण्यस्मरण !

या बंधुनो ! या भक्तांनो, हरिनामाचा गजर करू
पतीतपावन देव आपुला नाव तयाचे सार्थ करू
(जय जय विठ्ठल) ॥धृ॥

स्पर्शानें जो स्वये बाटतो परमेश्वर तो खरा नव्हे
दीनांना जो दूर लोटतो धर्म नव्हे तो धर्म नव्हे
ज्ञाना तुकया एकनाथही सांगुन गेले अम्हास हे
नको पुराणे नकोत पोथ्या अज्ञानाचा नाश करू
पतीतपावन देव आमुचा नाव तयाचे सार्थ करू ॥१॥

देव आमुचा खुशाल खातो उष्टी बोरे शबरींची
सुवर्णनगरी बांधुन देतो एक मूठ घ्या पोह्याची
नाम्यासंगे देव जेवतो पंगत बसली संतांची
चोखा गोरा समान सारे या जगतीचे वाटसरू
पतीतपावन देव आपुला नाव तयाचे सार्थ करू ॥२॥

यमुनेकाठी नित्य रंगला गोपाळांचा दहिकाला
रावरंक वा उच्चनीच हा भेद न ठावा कोणाला
बंधुत्वाचा समतेचाही मंत्र देतसे आम्हालां
मुरलीधर तो स्मरु एकदा सहभोजन या आज करू
पतीतपावन देव आपुला नाव तयाचे सार्थ करू ॥३॥

# १२

# शस्त्रसज्ज व्हा

दुसरे महायुद्ध सुरु झाले ही भारताच्या दृष्टीनें इष्टापत्तीच होती. 'रिक्रूटवीर' अशी हेटाळणी हसत हसत स्वीकारुन सावरकरांनी राष्ट्राला सैनिकीकरणाचा आदेश दिला. स्वत्वरक्षणाची ही मात्रा वेळीच लागू झाली असती तर १९६२ चा नामुष्कीचा प्रसंग गुदरुन लोकप्रिय नेत्यांना पश्चाताप करण्याची पाळी आली नसती. स्वातंत्र्य मिळाले तरीही ते सुसज्ज सेनेवाचून केवळ असुरक्षित. सावरकर म्हणतात "प्रत्येक भारतीय तरुणाला सक्तीचे सैनिकी शिक्षण देणे व देशाचे सैन्यबळ प्रबळ करणे ही भारताचे स्वातंत्र्य रक्षण

करण्याची गुरुकिल्ली आहे. सैन्य प्रबळ असेल तर युद्ध करण्याची पाळीच येणार नाही. म्हणून शस्त्रसज्ज व्हा ''

शस्त्रसज्ज व्हा । शस्त्रसज्ज व्हा
शस्त्रसज्ज, बंधमुक्त भारतीय व्हा ।।

शस्त्रसज्ज व्हा
शस्त्रसज्ज व्हा
शस्त्रसज्ज, बंधक्मुत भारतीय व्हा ।।धृ।।
फेकुनी द्या लेखणी ही
काय कामाची
अमुच्या हाती करुन घेते
सेवा गोऱ्यांची
मायभूमिच्या मुक्तीसाठी बंदुक हाती घ्या ।।१।।
पूर्वजांची वीरगाथा
व्यर्थ का गाता
गौरवाला पौरुषाची
जोड ना देता
गीत गाता सिंहाचे तर छावे त्यांचे व्हा ।।२।।
देव नाही दैव नाही
तारक कोणाचे
समर्थ सेना समर्थ बाहू
रक्षक साऱ्यांचे
शस्त्रच अपुले शास्त्र गड्यांनो सैनिक सारे व्हा ।३।।

# १३

# सांगता

जातिभेद हा हिंदुस्थानला मिळालेला शाप आहे असे परखड शब्दात सांगणारे व अंधश्रद्धेवर कठोर प्रहार करणारे समाजसुधारक सावरकर

'दर्भ नकोत दळभार हवेत' असे सूचक, वेचक, वेधक लिहणारे प्रखर राष्ट्रवादी सावरकर

क्रांतीकारकांचे कुलपुरुष म्हणून आचार्य अत्र्यांनी गौरविलेले असे वीर सावरकर, भारताच्या विभाजनापूर्वी वेळोवेळी भयसूचक घंटा वाजवणारे, अल्पसंख्यांकांच्या वाढत्या भुकेकडे लक्ष वेधणारे सावरकर

स्वातंत्र्यानंतरही 'आपल्या आहेत त्या सीमा तरी सुरक्षित राखा' असा घोष करणारे सावरकर

विज्ञाननिष्ठ व्हा, लेखण्या मोडा बंदुका घ्या असा मोलाचा संदेश देणारे गुरु सावरकर

माझी समुद्रातली उडी विसरलात तरी चालेल पण विज्ञाननिष्ठ होण्याचा मी दिलेला सामाजिक विचार विसरु नका असे कळकळीनें सांगणारे विज्ञानवादी सावरकर

अनेंक वेळा मृत्यूला हुलकावणी देऊन परतविणारे मृत्युंजय सावरकर, भारतमाता स्वतंत्र झालेली पाहुन स्वतःला कृतकृत्य मानू लागले. बाबारावांना – त्यांच्या वडील बंधूना– त्यांनी वचन दिले होते 'बाबा मी स्वतंत्र भारत पाहण्याचे तुमचें स्वप्न खरे करीन' आणि ह्या इच्छामरणी भीष्माने खरोखरीच आपला शब्द खरा केला. आपले जीवनकार्य संपले असे वाटल्यानंतर मात्र त्यांनी मृत्यूला आवाहन केले.

'मृत्यो ! आता ये,'

आणि आपल्या दैवताचा–प्रिय भारताचा–निरोप घेऊन या मायभूमीच्या पुजाऱ्यानें आपल्या कृतार्थ जीवनाची सांगता केली.

भारता, प्रिय दैवता ! ।
वंदना घ्यावी अता ।
मांडिला जो यज्ञ त्याची
आज आहे सांगता ।।

भारता, प्रिय दैवता !
वंदना घ्यावी अता
मांडिला जो यज्ञ त्याची
आज आहे सांगता ।।धृ।।

हिंद माझा देव आणि
तेच माझे ध्येयही
सफल वाटे जन्म आणि
सार्थ झाले स्वप्नही
पुण्य–उदरीं ठेव माते !
श्रांत काय ही अता ॥१॥

चेतवीले कुंड आणि
जाहलो यजमान मी
अर्पिता त्वत्स्थंडिली ना
राहिले काहीं कमी
खेद नाही खंत नाही
ही समीधा वाहता ॥२॥

कमलपुष्पे बिल्वपत्रें
वाहिली यज्ञेश्वरा
हवन केले मीच खुडुनी
कोवळ्या दुर्वांकुरा
चकित झाले विश्व सारे
सामगायन ऐकता ॥३॥

मातृसेवेस्तव कृतान्ता
चकविले मीं हरविले
मंत्र वंदे मातरम् हे
सत्य एकच जाणिले
हा विजेता शरण आता
ऊठ मृत्यो ! स्वागता ॥४॥



REFBK-0024055
REFBK-0024055

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९९४
क्र. २००५५
२०।११।८३
शाखा (स्थळ)

# - कलाकार -

संयोजक–

सौ. वसुंधरा बेन्नुरवार

संगीत–

श्री. पुंडलीक आवोजवार

तबला–

कुमार विद्याधर गोरे

व्हायोलियन–

कुमार मोहन पेंडसे

ढोलकी–

कुमार अशोक वैती

निवेदक–

सौ. लीला वेलंकीवार

गायक–

सौ. आसावरी देव

सौ. नीता कोल्हटकर

सौ. सुलभा कोपरकर

सौ. इंदुमती गोरे

सौ. वसुंधरा बेन्नुरवार

कु. माधवी गोखले

श्री. चंद्रकांत जोशी

श्री. मोहन चव्हाण

कुमार सचिन पेंडसे, हर्षद पाडळकर, कौस्तुभ काळे, पुष्कर व कौस्तुभ पटवर्धन, उदय नागवेकर, महेश भोसले, हरिश्चंद्र चव्हाण आणि मोझेस पुगावकर.

ऋणनिर्देश– श्री. व सौ. गोरे

॥ जिवलग बहु जी सरित्पतीला तद्विरहाची शपथ तया ॥
॥ घालिल कां कुणि अरसिक अळणी ? सरस कवीमन नसे जया ॥
॥ "असता दिवस न व्यर्थ गमविला म्हणुनि खेद ना अस्ताचा" ॥
॥ 'मरणोन्मुख शय्येवर' कथितो धन्य जन्म त्या वीराचा ॥

—सौ. लीला वेलंकीवार

मुद्रण सहाय्य- **कुमार श्रीकांत बेन्नुरवार**

**मुल्य रु. २-५०**

(दि स्टार प्रिंटर्स- डॉ. आंबेडकर रोड, उथळसर, ठाणे ४०० ६०१.)